औरंगाबाद येथे रेशीम उपसंचालक कार्यालय सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः आस्था २०१९/प्र.क्र.५० /रेशीम कक्ष
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

<u>प्रस्तावना-</u>

औरंगाबाद विभागात उपसंचालकाचे स्वतंत्र रेशीम कार्यालय सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावावर संचालक (रेशीम) यांनी दिनांक ३०/०८/२०१९ च्या पत्राद्वारे त्यांचे अभिप्राय सादर केले आहेत. औरंगाबाद विभागात स्वतंत्र रेशीम कार्यालय सुरु करण्यासाठी राजपत्रित/अराजपत्रित अशी एकूण १२ पदे नव्याने निर्माण करण्याचा प्रस्ताव रेशीम संचालनालयाने सादर केला आहे. तथापि, वस्त्रोद्योग धोरणांतर्गत जाहिर करण्यात आल्याप्रमाणे राज्यात वस्त्रोद्योग आयुक्तालयांतर्गत रेशीम संचालनालयाचा समावेश करुन त्यासाठीचा एकत्रित आकृतीबंध तयार करण्याची बाब स्वतंत्रपणे विचाराधीन आहे. सद्यस्थितीत राज्यातील एकूण तुती रेशीम क्षेत्र १९७८३ एकर आहे. त्यापैकी औरंगाबाद विभागातील ८ जिल्हयात ११३७३ एकर क्षेत्र आहे. हे क्षेत्र राज्याच्या एकूण तुती रेशीम क्षेत्राच्या निम्याहुन जास्त आहे. त्यास अनुसरुन रेशीम संचालनालयांतर्गत एकूण मंजूर असलेल्या पदांपैकी रेशीम शेती खालील क्षेत्राच्या अनुषंगाने वेगवेगळया विभागातील पदांचे वाटप समप्रमाणात असणे आवश्यक आहे. या दृष्टीने राज्यातील ज्या ज्या क्षेत्रात रेशीम शेती खालील क्षेत्र कमी आहे अशा भागातील रेशीम कर्मचारी हे ज्या क्षेत्रात रेशीम शेती जास्त आहे त्या क्षेत्रात स्थलांतरित करुन प्रशासकीय कामकाज पार पाडणे व्यावहारिक होईल.

वरील वस्तुस्थिती तसेच औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हयात रेशीम शेतीला शेतक-यांकडून मिळणारा प्रतिसाद व त्या अनुषंगाने औरंगाबाद विभागात रेशीम शेती व उद्योगासाठी प्रामुख्याने उभारण्यात येणा-या विविध पायाभूत सुविधा लक्षात घेता औरंगाबाद येथील प्रादेशिक रेशीम कार्यालयाचे मजबुतीकरण करुन त्या विभागात उपसंचालक पदावरील प्रादेशिक अधिकारी नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्यात रेशीम शेती खालील बहुतांश क्षेत्र हे औरंगाबाद विभागात आहे. रेशीम शेतीसाठी व त्याआधारे रेशीम उद्योगाच्या विकासासाठी औरंगाबाद विभागात रेशीम उपसंचालक कार्यालय सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यास अनुसरुन प्रादेशिक रेशीम कार्यालय औरंगाबाद व नागपूर येथील संचालनालयातील उपसंचालक, रेशीम (तुती) ही कार्यालये व त्यावरील अधिकारी व कर्मचारी यांचे स्थलांतर करण्याबाबत खालीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतला आहे.

१. नागपूर येथील मुख्यालयातील उप संचालक (तुती) हे पद प्रादेशिक रेशीम कार्यालय, औरंगाबाद येथे स्थलांतरीत करण्यात यावे. यापुढे या कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखाचे पदनाम उपसंचालक, औरंगाबाद असे राहील.
२. सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, औरंगाबाद हे पद रेशीम संचालनालय, नागपूर येथे स्थलांतरीत करण्यात यावे. रेशीम संचालनालयातील हे पदनाम यापुढे सहायक संचालक (तुती) असे राहील.
३. वरीलप्रमाणे स्थलांतर करताना त्या पदावर कार्यरत अधिकारी सुध्दा स्थलांतरीत होतील व त्यांचे वेतन व भत्ते नव्याने स्थलांतरीत कार्यालयातून निघेल. श्री. डी.ए.हाके, उपसंचालक हे औरंगाबाद येथे व श्री. एम.बी.ढवळे, सहायक संचालक हे रेशीम संचालनालय, नागपूर येथे रुजू होतील.
४. वरीलप्रमाणे सहायक संचालक, औरंगाबाद या कार्यालयात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यापुढे उपसंचालक, औरंगाबाद यांच्या अधिनस्त कार्यरत राहतील.तसेच रेशीम संचालनालयातील रेशीम उपसंचालक (तुती) यांच्या अधिनस्त सर्व कर्मचारी या पुढे सहायक संचालक (तुती) यांच्या अधिनस्त काम पाहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१७५७५८०२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co Operation Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2019.09.18 18:05:22 +05'30'

(आ.अ.लोपिस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
४) मा.मंत्री(वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव.
५) मा.राज्यमंत्री(वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव.
६) मा.महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), मुंबई

७) महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), नागपूर
८) संचालक , लेखा व कोषागारे, मुंबई
९) सर्व विभागीय आयुक्त.
१०) सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी,
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१२) संचालक, रेशीम संचालनालय, (म. रा.), प्रशासकीय इमारत क्रमांक -२, ६ वा माळा, बी - विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१
१३) सर्व सहायक संचालक, प्रादेशीक रेशीम कार्यालय,
१४) सर्व जिल्हा रेशीम विकास अधिकारी श्रेणी १ / २, जिल्हा रेशीम कार्यालय,
१५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद
१६) महाराष्ट्र राज्यातील सर्व संसद सदस्य
१७) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
१८) निवड नस्ती (रेशीम कक्ष),